# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),गडचिरोली यांचे कार्यालय.

वन प्रशासकीय भवन, पोटेगांव रोड, गडचिरोली-442605 (महाराष्ट्र)

दुरध्वनी क्र. 07132-233184 फॅक्स क्र. 07132-233187 Email-ccfgadchiroli@mahaforest.gov.in


क्रमांक कक्ष-3(1)/तेंदु/विक्री/2025-26/ २१54 गडचिरोली, दिनांक :- 30/9/2025

प्रति,

उप वनसंरक्षक,
आलापल्ली वनविभाग आलापल्ली

**विषय** :- इमारती मालाचे जाहीर खुले लिलावाचे आयोजन करणेबाबत.
सुधारीत तारखा आवंटित करणेबाबत.

**संदर्भ** :-1) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-3(1)/तेंदू/विक्री/2051 दिनांक 19.09.2025
2) आपलेकडील पत्र क्रमांक कक्ष-3(4)/राजस्व/विक्री/2025-26/574 दिनांक 21.08.2025
3) प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपुर यांचे पत्र क्रमांक कक्ष-16/ए-2/जाहीर लिलाव/2025-26/1078 दिनांक 26 सप्टेंबर 2025
4) या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-3(1)/तेंदू/विक्री/2122 दिनांक 29.09.2025
5) आपलेकडील पत्र क्रमांक कक्ष-3(4)/राजस्व/विक्री/2025-26/712 दिनांक 30.09.2025

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक-1 अन्वये विविध डेपोवर विक्रीकरीता शिल्लक असलेल्या वनोपजाचे लिलावाकरीता माहे ऑक्टोंबर 2025 या महिण्यात विभागनिहाय लिलाव तारखा आवंटीत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार आलापल्ली वनविभागाकरीता खालीलप्रमाणे तारखा आवंटीत करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | वनविभाग | इतर किसम इमारती करीता | साग इमारती करीता | जळाऊ बिटे व बांबू करीता |
|---|---|---|---|---|
| 1 | आलापल्ली | दिनांक 9 व 10 आणि 29, 30 व 31 ऑक्टोंबर पुर्ण दिवस | दि. १५ व 15 ऑक्टो. पुर्ण दिवस | दिनांक 9 व 10 आणि 29, 30 व 31 ऑक्टोंबर पुर्ण दिवस (जळाऊ) व 15 ऑक्टोंबर बांबू |

प्रकरणी आलापल्ली वनविभागातील तहकुब असलेला वनोपज खुला लिलावात विक्रीकरीता संदर्भिय पत्र क्रमांक-2 अन्वये प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेले होते. त्याअनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपुर यांचेकडील संदर्भिय पत्र क्रमांक-3 अन्वये तहकुब असलेल्या वनोपज खुले लिलावाचे आयोजन करुन विक्री करणेकरीता मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून, संदर्भिय पत्र क्रमांक-4 अन्वये आपणास कळविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने आपलेकडील संदर्भिय पत्र क्रमांक-5 अन्वये जाहीर लिलावाचे आयोजन करणेकरीता तारखा आवंटीत करुन देण्यास विनंती केलेली आहे.

तरी संदर्भिय पत्र क्रमांक-1 अन्वये वरीलप्रमाणे इतर किसम इमारती वनोपजकरीता आवंटित केलेल्या तारखापैकी दिनांक 09 व 10 ऑक्टोंबर 2025 रोजीचे ई-लिलाव रद्द करुन, त्याऐवजी **दिनांक** 09 **ऑक्टोंबर रोजी आलापल्ली विक्री डेपो व दिनांक** 10 **ऑक्टोंबर रोजी घोट विक्री डेपो येथे खुले लिलाव घेण्यास तारखा आवंटित करण्यात येत आहे.** करीता वरील तारखेस खुले लिलावाचे आयोजन करावे.

(एस. रमेश कुमार)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
गडचिरोली

प्रतिलीपी :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
प्रतिलीपी :- एनआयसी. समन्वयक. निर्देशन विभाग. गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित